POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२४२ ● मुंबई, रविवार, ०५ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## नियतीचा क्रूर खेळ, स्नेहसंमेलनावरुन येताना कार विहिरीत कोसळली

# चिमुरड्यांसह एकाच कुटुंबातील 9 जणांचा दिंडोरीत अंत

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

नाशिकमधून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. ही घटना नाशिकमधील जिल्ह्यातील दिंडोरी येथे घडली आहे. दिंडोरी येथे घडलेल्या एका भीषण अपघाताने संपूर्ण राज्य हादरले आहे. भरधाव वेगात धावणारी एक चारचाकी कार अचानक नियंत्रणाबाहेर जाऊन थेट विहिरीत कोसळली. या दुदैवी घटनेत गाडीत असलेल्या नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला. विशेष म्हणजे मृतांमध्ये एका कुटुंबातील अनेक सदस्यांचा समावेश असल्याने या घटनेने अधिकच हळहळ व्यक्त होत आहे. स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आटपून दरगोडे कुटुंब घरी येत असताना त्यांच्यावर हा काळाचा घाला पडला.



**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना शुक्रवारी 3 एप्रिल रोजी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास घडली. शिवाजी नगर परिसरात असलेल्या एका विहिरीत एमएच15-जेएस-1053 क्रमांकाची कार कोसळली. अपघात होताच मोठा आवाज झाल्याने परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. त्यांनी तत्काळ प्रशासनाला कळवून बचावकार्य सुरू केले. मात्र विहिरीत मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने आणि अंधारामुळे बचावकार्य करताना अनेक अडचणी आल्या.

**खासगी क्लासच्या कार्यक्रमावरून परतत होते**

बचावकार्यात क्रेनच्या सहाय्याने कार विहिरीतून बाहेर काढण्यात आली. कार बाहेर काढल्यानंतर त्यामध्ये एकूण नऊ जण असल्याचे स्पष्ट झाले. सगळ्यात दुर्दैव म्हणजे त्या कारयामध्ये असलेल्या सर्वाचा मृत्यू झाला. एका खासगी क्लासच्या कार्यक्रमावरून परत येत असताना त्यांच्यावर ही काळाने झडप घातली.

**रात्रभर शोध आणि बचाव मोहीम**

घटनेनंतर स्थानिक प्रशासन, आपत्कालीन पथके तसेच नागरिकांनी एकत्रितपणे रात्रभर शोध आणि बचाव मोहीम राबवली. विहिरीतील पाण्याची पातळी जास्त असल्याने आणि अंधारामुळे शोधकार्याला विलंब झाला. तरीही सर्वांना बाहेर काढण्यात आले, मात्र कोणाचाही जीव वाचवता आला नाही. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**अपघाताचे नेमके कारण काय?**

या अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वाहनाचा वेग जास्त होता का, चालकाचे नियंत्रण सुटले का, किंवा रस्त्याची स्थिती खराब होती का याबाबत तपास सुरू आहे. पोलिसांनी याप्रकरणी चौकशी सुरू केली असून लवकरच यामागील कारण समोर येण्याची शक्यता आहे.

**प्राथमिक अंदाज**

रात्रीच्या अंधारात कठडा नसलेल्या विहिरीचा अंदाज चालकाला आला नसावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. ही विहीर राजू राजे यांच्या मालकीची असल्याचे सांगितले जाते. या घटनेने दिंडोरीतील इंदोरे गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात शोकमग्न वातावरण आहे.

**मृतांची नावं**

- सुनील दत्तात्रेय दरगोडे, 34, वडील
- रेशमा सुनील दरगोडे, 29, आई
- राखी उर्फ गुणवंती सुनील दरगोडे, 10, मुलगी
- आशा अनिल दरगोडे, 34, आई
- श्रुष्टि अनिल दरगोडे, 14, मुलगी
- माधुरी उर्फ श्रद्धा अनिल दरगोडे, 13, मुलगी
- श्रेयश अनिल दरगोडे, 11, मुलगा
- श्रावणी अनिल दरगोडे, 11, मुलगी
- समृद्धी राजेंद्र दरगोडे, 7, पुतणी

## दिंडोरी अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे शालेय विद्यार्थ्यांचे एक वाहन विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, यात ६ विद्यार्थी आहेत. या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत दुःख व्यक्त केलं आहे. तसेच मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर केली आहे. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे शालेय विद्यार्थ्यांचे एक वाहन विहिरीत कोसळून झालेल्या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला, यात ६ विद्यार्थी आहेत. ही अतिशय दुर्दैवी आणि मनाला वेदना देणारी ही घटना आहे. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. मंत्री गिरीष महाजन यांच्याशी मी चर्चा केली असून त्यांनी घटनास्थळी भेट दिली आणि ते समन्वय साधून आहेत. तसेच मृतांच्या वारसांना रु. ५ लाख आर्थिक मदत राज्य सरकारतर्फे देण्यात येईल. या घटनेची चौकशी करण्याचे आदेश सुद्धा जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत.

## अनधिकृत बांधकाम प्रकरणी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा

**सत्ताधारी-विरोधकांची एकमुखी मागणी**




■ **मुंबई। प्रतिनिधी,**

अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात नगरसेवकांवर पात्रतेची कारवाई करण्यात येते. तर मग अनधिकृत बांधकामांना अभय देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करा, अशी मागणी शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक यशोधर फणसे यांनी हरकतीच्या मुद्द्याद्वारे स्थायी समितीच्या बैठकीत केली होती. त्यानंतर यशोधर फणसे यांच्या मागणीला भाजपचे सभागृहनेते गणेश खणकर आणि स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनीही आपले मत मांडत पाठिंबा दर्शविला.

यशोधर फणसे यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर गणेश खणकर म्हणाले की, नगरसेवकांना अनधिकृत बांधकामांबाबत जर अपात्र ठरवले जात असेल, तर अधिकाऱ्यांवरील कारवाईचे काय? दोषी अधिकाऱ्यांचे पेन्शन, ग्रॅच्युटी रोखणार का? असे सवाल उपस्थित करीत यशोधर फणसे यांच्या मागणीला समर्थन दिले. त्यानंतर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी निवडणूक कालावधीत अनधिकृत बांधकामांबाबत आपण स्वतः तक्रार केली असताना अधिकारी वर्ग अनधिकृत बांधकामांवर कारवाई न करता त्यांना पाठीशी घालीत असल्याचा धक्कादायक अनुभव सांगितला.

तसेच, अनधिकृत बांधकामप्रकरणी जर नगरसेवकांना अपात्र ठरवले जाते, तर लाभार्थी धोरण राबविणाऱ्या आणि अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कडक कारवाई झालीच पाहिजे. त्यांनाही एकदा चांगलच धडा शिकविण्यात यावा आणि त्यांनाही त्याची किंमत मोजू द्या, असे सांगत प्रभाकर शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. याचवेळी अनधिकृत बांधकामांबाबत नगरसेवकांनी तक्रार केल्यास संबंधित अधिकारीच त्या तक्रारदारांची नावे अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांना कळवतात. त्यामुळे नगरसेवकांचा जीव धोक्यात येऊ शकतो, अशी भिती देखील त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, यशोधर फणसे यांनी वर्सोवा आदी परिसरात अनधिकृत इमारत बांधकामे उभी राहिल्याची तक्रार पालिकेच्या विभाग कार्यालयात केली होती. मात्र त्यावर कारवाई न करता त्या अनधिकृत बांधकामाला संबंधित अधिकाऱ्यांनी पाठीशी घातल्याची तक्रार त्यांनी हरकतीच्या मुद्द्याद्वारे स्थायी समितीच्या बैठकीत केली होती. सभागृह नेते गणेश खणकर यांनी मुंबईतील अनधिकृत बांधकामांची माहिती घेण्यासाठी सेटेलाईट इमेज तपासण्यात यावी, अशी सूचना केली.

गणपत पाटील नगर, कुर्ला, मालवणी आदी परिसरात अनधिकृत बांधकामे झाल्याची माहिती देखील त्यांनी उघड केली. तसेच, प्रतीक्षा नगर, वरळी नाला येथे दुतर्फा अनधिकृत बांधकामे करण्यात आली असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. गेल्या 20 वर्षात मुंबईत काय बदल झाले, हे तपासण्याबाबत पालिका काय भूमिका घेणार?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावेळी, भाजपचे नगरसेवक शिवकुमार झा यांनी त्यांच्या मतदारसंघात अनधिकृतपणे शालेय बांधकाम झाल्याचे सांगत कारवाई करण्याची मागणी केली.

# नाशिकमध्ये 'खरात पार्ट 2'!

## सेक्स स्कँडल प्रकरणात धक्कादायक खुलासा

### उद्योजक आणि एनजीओ संस्था चालकाकडून 121 महिलांचं लैंगिक शोषण

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण महाराष्ट्रात गाजत आहे. याप्रकरणात दररोज नवंनवीन खुलासे होत आहे. महिलांचे लैंगिक शोषण आणि बलात्कार प्रकरणात अशोक खरात तुरुगांत आहे. या व्यक्ती भोंदूगिरीच्या नावाखाली महिलांच नाही तर व्यावसायिकांनाही लुटलं आहे. त्यांची गुन्हेगारी जगातील कारनामे तपासात समोर येत आहे. अशातच नाशिकमध्ये अजून एका अशोक खरात पार्टन 2 समोर आलं आहे. सातपूरमधील व्यावसायिकाचा टॅब चोरीला गेला होता. ज्यात 200 हून अधिक अश्लील व्हिडीओ सापडले आहेत. पोलिसांनी या प्रकरणात महिलांना समोर येऊन गुन्हा दाखल करण्याचे आवाहन केलं होतं. त्यानंतर त्या व्यावसायिकावर पहिला गुन्हा दाखल झाला आहे.

**व्हिडिओबाबत पोलिसांकडून तपास अधिक गतीने**

या व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या महिलांचं शारीरिक शोषण झालं होतं का? त्यांना ब्लॅकमेल केलं जात होतं का? त्या दिशेने आता पोलिस अधिक तपास करत असल्याची माहिती पोलिस उपआयुक्त किशोर काळे यांनी दिली आहे. त्यामुळे आता अशोक खरात याच्यानंतर आणखी एक भयंकर प्रकार उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तक्रारदार हा सातपूर परिसरातच राहणारा असून, सदर हार्ड डिस्कमध्ये आढळून आलेले महिलांचे व्हिडिओ हे हॅण्डिकॅम आणि मोबाईलच्या सहाय्याने चित्रित केले असावे अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असून पोलिसांकडून आता याच्या तपासासाठी विशेष पथक स्थापन केले जाणार आहे. या व्हिडिओमधील महिलांचा शोध घेऊन त्यांचा लैंगिक छळ झाला आहे का? त्या दिशेने तपास सुरु आहे.या प्रकरणात जर कुठल्या महिलेचे लैंगिक शोषण झाले असेल तर त्यांनी न घाबरता सातपूर पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

त्यामुळे आता अशोक खरात प्रकरणानंतर समोर आलेल्या सातपूर येथील या महिलांच्या आक्षेपार्ह व्हिडिओ प्रकरणी पोलिस तपासात काय समोर येते याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.




**4 मोबाईल, 2 पेनड्राईव्ह, 1 मेमरी कार्ड जप्त**

नाशिकच्या सातपूर परिसरामध्ये एका बड्या व्यावसायिकाचे आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत त्याच्याकडून 12 लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. याप्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी त्या चार चोरांना अटक केली. त्यानंतर पोलिसांना या अश्लील व्हिडीओमागे काहीतरी दडलंय अशा संशय आला होता. त्यांनी तपास सुरु ठेवला आणि महिलांना पुढे येण्याचे आवाहन केलं. त्यानंतर एका महिलेने व्यावसायिक आणि एनजीओ संचालक यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. उद्योजक आणि एनजीओ संचालकाकडून 100 हुन महिलांचे लैंगिक शोषण झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. संशयित आरोपी रवींद्र एरंडे (वय 63) ला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. गरजू महिलांचे आक्षेपार्य व्हिडीओ बनवून लैंगिक शोषण केल्याप्रकरणी खंडणीचा गुन्हा दाखल करणाऱ्या या व्यावसायिका विरोधातच पीडित महिलेकडून पहिला गुन्ह्याची नोंद झली आहे. टॅबमध्ये पोलिसांना 87 आक्षेपार्ह व्हिडीओ सापडले त्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले. पोलिसांनी 4 मोबाईल, 2 पेनड्राईव्ह, 1 मेमरी कार्ड जप्त केली आहेत. गरजू महिलांना नोकरीचे आमिष दाखवून शोषण केल्याचा आरोप व्यावसायिक रवींद्र एरंडे यांच्यावर करण्यात आला आहे.

**ब्लू फिल्म म्हणून विकायचा अश्लील व्हिडीओ?**

आरोपीने महिलांना नोकरीचं आमिष दाखवून त्यांचं लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. आरोपी हा नाशिक, इगतपुरी येथील हॉटेलमध्ये अत्याचार करून त्या घाणेरड्या कृत्यांचं गुपचूप चित्रीकरण, रेकॉर्डिंग करायचा, एवढंच नव्हे तर तो त्या अश्लील व्हिडिओंची 'ब्लू फिल्म' म्हणून विक्री करत होता, असाही संशय आहे. या घटनेतील पीडितांमध्ये अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, कंपनी कामगार व घरकाम करणाऱ्या महिलांचा समावेश असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. बलॅकमेलिंगद्वारे पैशांची मागणी झाली का हेही तपासण्यात येत आहे. पीडितांमध्ये अनेक महिलांचा समावेश आहे. या आरोपीवर बलात्कार व ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणातील इतर स्पॉट्स व लिंकचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. या भयानक प्रकारामुळे नाशिकमध्ये प्रचंड खळबळ माजली आहे.

## भारतीय जहाज 'ग्रीन सान्वी' ४४,००० टन एलपीजी घेऊन होर्मुझहून रवाना

■ **मुंबई। प्रतिनिधी,**



पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले आहेत, ज्यामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचे संकट निर्माण झाले आहे. भारतात एलपीजीच्या खेपांसाठी लांबच लांब रांगा लागत आहेत. दरम्यान, होर्मुझमधून भारतासाठी एक महत्त्वपूर्ण दिलासादायक बातमी आली आहे. अमेरिका आणि इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर, इराणने अनेक भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. आणखी एका भारतीय ध्वज असलेल्या जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी पार केली आहे.पश्चिम आशियामध्ये युद्ध सुरू झाल्यापासून भारतात एलपीजी घेऊन जाणारी सहा जहाजे दाखल झाली आहेत. एका महिन्याच्या आत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारे हे सातवे भारतीय जहाज आहे. हे जहाज ४४,००० मेट्रिक टनांहून अधिक एलपीजी घेऊन जात आहे. या जहाजाच्या आगमनामुळे लोकांना एलपीजीचा दिलासा मिळेल, अशी आशा आहे. जहाजाच्या ट्रॅकिंग डेटानुसार, पर्शियन आखातात नांगरलेला 'ग्रीन सान्वी' हा एलपीजी टँकर, इराणी सागरी मार्गाचा वापर करून शुक्रवारी संध्याकाळी होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्व बाजूला पोहोचला. हा टँकर आता मुंबई बंदराच्या दिशेने जात आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या या जहाजाचे नाव 'ग्रीन सान्वी' आहे.

## बोगस डॉक्टरांविरुद्ध गुन्हे शाखेची मोठी कारवाई... गोवंडीत दोन तोतया अटकेत

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईच्या शिवाजी नगर-गोवंडी परिसरात लोकांच्या आरोग्याशी खेळ मांडणाऱ्या दोन बोगस डॉक्टरांना गुन्हे शाखेने रंगेहाथ पकडून अटक केली आहे. हे दोन्ही आरोपी कोणत्याही वैद्यकीय पदवीशिवाय किंवा अधिकृत प्रशिक्षणाशिवाय दवाखाने चालवत होते आणि गंभीर आजारांवर उपचार करण्याच्या बहाण्याने रुग्णांकडून मोठी रक्कम उकळत होते.

या परिसरात बेकायदेशीर दवाखाने सुरू असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेच्या 'युनिट-६'ला काही काळापासून मिळत होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर, पोलिसांनी मुंबई महानगरपालिकेच्या 'एम-वॉर्ड पूर्व' (देवनार) येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने एक संयुक्त मोहीम हाती घेतली. या पथकाने शिवाजी नगर परिसरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेल्या दवाखान्यांवर अचानक छापे टाकले.



छाप्यादरम्यान, राजीव कपिलदेव रंजन (34) आणि कुबेरनाथ गोमती यादव (56) हे रुग्णांची तपासणी करताना आणि औषधे देताना आढळून आले. जेव्हा त्यांना त्यांच्या वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित परवाने आणि कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात आले, तेव्हा ते कोणतीही वैध प्रमाणपत्रे सादर करू शकले नाहीत. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, या दोघांपैकी कोणाकडेही वैद्यकीय क्षेत्रातील कोणत्याही शाखेची पदवी नव्हती, तसेच त्यांची 'महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल'कडे नोंदणीही झालेली नव्हती. असे असूनही, ते स्वतःला डॉक्टर भासवून लोकांवर उपचार करत होते आणि त्याद्वारे आपल्या रुग्णांचा जीव धोक्यात घालत होते.

या कारवाईदरम्यान, पोलिसांनी दवाखान्यांमधून मोठ्या प्रमाणात इंजेक्शन्स, सिरिंज, प्रतिजैविक औषधे (अँटीबायोटिक्स) आणि इतर वैद्यकीय साहित्य जप्त केले आहे. तसेच या दोन्ही आरोपींविरुद्ध शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर आता फसवणूक करणारे दवाखाने किती काळापासून सुरू होते, याचा तपास गुन्हे शाखा करत आहे.

## मुलीसमोरच सोने व्यापाऱ्याला बेदम मारहाण... रेल्वेचे 3 पोलीस कर्मचारी बडतर्फ

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई सेंट्रल स्टेशनवर एका सोने व्यापाऱ्याला अडवून त्याला मारहाण करणे आणि त्याच्याकडून जबरदस्तीने पैसे वसूल केल्याप्रकरणी रेल्वे पोलिसांच्या तीन कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आलं आहे. हा निर्णय विभागीय चौकशीनंतर घेण्यात आला आहे. तसेच, सोने व्यापाऱ्याला त्याच्या अल्पवयीन मुलीसमोर मारहाण केल्यानं या प्रकरणाकडे गांभीयार्न पाहिलं गेलं.

ही घटना १० ऑगस्ट २०२५ घडली होती. त्यानंतर सहायक उपनिरीक्षक ललित जगताप, कर्मचारी राहुल भोसले आणि अनिल राठोड यांना निलंबित करण्यात आले होते. आता ३० मार्च रोजी तिघांना सेवेतून बडतर्फ करण्याचा आदेश निघाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजस्थानमधील एक सोने व्यापारी हा आपल्या आठ वर्षांच्या मुलीसोबत रक्षाबंधनाच्या निमित्ताने मुंबईला आला होता. परतीच्या प्रवासाला जाण्यासाठी तो दुरंतो एक्स्प्रेस पकडायला मुंबई सेंट्रल स्टेशनवर आला. व्यापाऱ्यासोबत त्याचा मेहुणाही होता, जो त्याला स्टेशनवर सोडायला आलेला.

रात्री १०.३० वाजता व्यापारी मुलीसोबत प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर पोहोचल्यावर एका रेल्वे पोलील कर्मचाऱ्याने बॅग तपासण्याच्या निमित्ताने त्यांना थांबवलं. चौकशीदरम्यान व्यापाऱ्याच्या बॅगेत १४ ग्रॅमचे सोन्याचे बिस्किट आणि ३१ हजार रोख रक्कम आढळून आली.

व्यापाऱ्याने पोलिसाला सांगितलं की, तो मुंबईत एक ज्वेलरी प्रदर्शन आणि बहिणीला भेटण्यासाठी आला होता. पण, पोलिसानं त्याच्यावर विश्वास ठेवला नाही आणि आणखी एका पोलीस कर्मचाऱ्याला बोलावून घेतले. त्यानंतर व्यापारी, त्याची मुलगी आणि मेहुण्याला स्टेशन परिसरातून बाहेर गल्लीतील एका खोलीत नेण्यात आले. तिथे आणखी एक पोलीस कर्मचारी आधीपासून उपस्थित होता. हा पोलीस कर्मचारी त्यांचा वरिष्ठ अधिकारी असल्याचे सांगण्यात आले.

तीनही पोलीस कर्मचाऱ्यांनी मुलीसमोर व्यापाऱ्याला शिव्या दिल्या आणि चापटाही मारल्या. रात्रभर तुरूंगात ठेवण्याची धमकीही दिली. ज्यामुळे व्यापाऱ्याची मुलगी रडू लागली. पोलीस कर्मचाऱ्याने सोन्याचे बिस्किट जप्त करून न्यायालयासमोर सादर करण्याची धमकी दिली. तसेच, त्याच्याकडे आधार कार्ड मागण्यात आले. व्यापाऱ्याकडून कोऱ्या कागदांवर सह्याही करून घेण्यात आल्या.

रात्री १०.५५ च्या सुमारास पोलीस कर्मचाऱ्यांनी व्यापाऱ्याला सोन्याचे बिस्किट परत दिले. पण, रोख पैसे आपल्याकडेच ठेवले. व्यापाऱ्याने खूप विनंती केल्यानंतर त्याला फक्त १९०० रुपए देण्यात आले.

यानंतर राजस्थानला पोहोचल्यानंतर व्यापाऱ्याने १६ ऑगस्ट रोजी तक्रार दाखल केली. तिथून हे प्रकरण रेल्वे पोलीस आणि नंतर रेल्वे क्राइम ब्रँचकडे पाठवण्यात आले. विभागीय चौकशीत दोषी आढळल्यानंतर तीनही पोलीस कर्मचाऱ्यांवर बडतफीर्ची कारवाई करण्यात आली आहे.





## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# पापाचे धनी कोण?



गर्दीच्या ठिकाणी घडणाऱ्या चेंगराचेंगरीच्या घटना भयानक असतात. ज्यांनी चेंगराचेंगरी अनुभवली असेल, त्यांना तिचे गांभीर्य अधिक चांगल्या प्रकारे ठाऊक असेल. आताही नालंदा (बिहार) येथील श्री शीतलामाता मंदिरात ३१ मार्चला चेंगराचेंगरी होऊन ९ भाविकांचा मृत्यू झाला. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांवरून एक प्रश्न पडतो की, हे सर्व कधी थांबणार? 'भारत हे जगाचे देवघर आहे', असे म्हटले जाते. मंदिरे, धार्मिक सण-उत्सव, जत्रा आदी या राष्ट्रासाठी चैतन्याचे स्रोत आहेत. त्यामुळे अशा कार्यक्रमांनिमित्त लाखो भाविक देवदर्शनासाठी जातात. तेथे जाऊन कुळधर्म-कुलाचार करतात, नवस बोलतात, प्रथा-परंपरा जपतात आणि त्या माध्यमातून आत्मिक समाधान शोधतात; परंतु या पवित्र स्थळीच वारंवार घडणाऱ्या चेंगराचेंगरीच्या घटनांकडे केवळ अपघात म्हणून पहाणे चुकीचे ठरेल. आपल्याकडे अशा घटनांत मृतांच्या कुटुंबियांना साहाय्य करणे, शाब्दिक संवेदना प्रकट करणे, वृत्तपत्रांत बातम्या येणे या पलीकडे काहीही होत नाही. त्यामुळे आजही एक मूलभूत प्रश्न उभा रहातो, तो म्हणजे या निरपराध भाविकांच्या जीवितहानीच्या पापाचे धनी कोण? अशा घटनांमुळे कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अशा घटनांनंतर आणखी एक पार पाडला जाणारा सोपस्कार म्हणजे चौकशी समिती नेमणे, अहवाल सिद्ध करणे, काही पालट करण्याचे प्रावधान (शिफारसी) करणे. यात काही कालावधी गेला की, घडलेली घटना सर्वांच्याच विस्मृतीत जाते. अशा प्रसंगांत ना ठोस दायित्व निश्चित होते, ना कठोर शिक्षा दिली जाते. हीच असंवेदनशीलता, उदासीनता आणि निष्काळजीपणा पुन्हा नव्या दुर्घटनांना आमंत्रण देते. हे चित्र कुठेतरी पालटायला हवे! चेंगराचेंगरीसारख्या घटनांमागील नेमके कारण कळणे पुष्कळ कठीण असते. याचाच अपलाभ उठवत प्रशासकीय यंत्रणा अशा घटनांना अफवा कारणीभूत असल्याचे सांगून मोकळ्या होतात. काही वेळेला तसे असेलही; परंतु बहुतांश वेळा हेच कारण सांगितले जाते, हे अयोग्य आहे. बरं, या अफवा केवळ योगायोगाने पसरतात का? कि यामागे काही समाजकंटकांचे नियोजित षड्यंत्र आहे?, या दृष्टीने सखोल आणि व्यापक अन्वेषण कितपत होते?, हा गांभीर्याने विचार करण्याचा विषय आहे. जर खरोखरच काही विघातक शक्ती अशा धार्मिक कार्यक्रमांना लक्ष्य करत असतील, तर तो केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय सुरक्षेचाही आहे. प्रत्येक दुर्घटनेनंतर केवळ अफवांवर, म्हणजेच एकाअर्थी भाविकांवर खापर फोडून आपल्या यंत्रणा नामानिराळ्या रहातात. पोलीस आणि प्रशासन यांचे दायित्वही तितकेच मोठे आहे. लाखो भाविकांची गर्दी होणार, हे ठाऊक असतांनाही अनेक ठिकाणी नियोजनाचा अभाव दिसून येतो. अरुंद रस्ते, अपुरे प्रवेश-निर्गमन मार्ग, योग्य दिशादर्शक फलकांचा अभाव, वाहतूक व्यवस्था नसणे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्याची यंत्रणा नसणे, अशा एक ना अनेक गोष्टी चेंगराचेंगरीस कारणीभूत ठरतात. गर्दी नियंत्रण हे एक शास्त्र आहे आणि त्यासाठी केवळ पोलिसांचा बंदोबस्त पुरेसा नसतो. त्यासाठी सूक्ष्म नियोजन, पूर्वसिद्धता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक असतो, जो होतांना दिसत नाही. दुर्दैवाने प्रत्येक दुर्घटनेनंतर त्यावर उपाय म्हणून प्रशासन सोपा मार्ग निवडते, तो म्हणजे अशा धार्मिक ठिकाणच्या धार्मिक प्रथा-परंपरांवर बंदी घालणे. श्रीफळ वाढवणे, विशिष्ट पद्धतीने दर्शन घेणे, अशा काही प्राचीन धार्मिक परंपरांवर थेट बंदी घातली जाते. काही ठिकाणी तर चेंगराचेंगरीच्या घटनेचे निमित्त करून ते मंदिरच सरकार स्वतःच्या नियंत्रणात घेते. हे करतांना कुठल्याही धर्माचार्यांचे मत विचारात घेतले जात नाही. या उपायांनी मूळ समस्या सुटत तर नाहीच, उलट भाविकांच्या श्रद्धेला धक्का पोचतो. प्रथा-परंपरांचे पालन ही केवळ कृती नसते, तर त्याच्याशी धार्मिक भाव-भावना जोडलेल्या असतात. त्यामुळे त्या बंद करण्याऐवजी त्या सुरक्षित पद्धतीने कशा राबवता येतील? यावर भर देणे आवश्यक आहे, अन्यथा 'प्रशासन स्वतःचे अपयश झाकण्यासाठी श्रद्धेचा बळी देत आहे', असेच म्हणावे लागेल. अशा उपयायोजना काढणे म्हणजे 'आग रामेश्वरी, बंब सोमेश्वरी' यातील प्रकार आहे. अशा घटनांमध्ये भाविकांचेही काही दायित्व असते, हे नाकारता येत नाही. अनेकदा भाविक संयम सोडतात, रांगेचे नियम मोडतात, अफवांवर विश्वास ठेवतात, ढकलाढकली करून घाईघाईत पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेही गर्दी अनियंत्रित होऊन चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण होते. तथापि ही मानवी प्रवृत्ती लक्षात घेऊनच सरकारी यंत्रणांनी व्यवस्था उभारली पाहिजे. नेमके तेच होत नाही. खरेतर अशी व्यवस्था नसणे, हेच दुर्घटनेला आमंत्रण असते. त्यामुळे अशांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अशा घटनांचे चौकशी अहवाल येतात; पण संबंधित उत्तरदायी अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे जीवितहानी झाली असेल, तर त्याला मात्र कठोर शिक्षा होतांना दिसत नाही. येथेच अधिकाऱ्यांचे फावते. कायद्याचा धाक निर्माण झाल्याविना सुधारणा होणार नाही. असे झाले नाही, तर प्रत्येक दुर्घटना ही केवळ 'दुर्दैवी घटना' म्हणून नोंदवली जाईल आणि त्यामागील पापाचे धनी मोकाट फिरत रहातील. भारत हा १४० कोटी लोकांचा देश आहे. त्यामुळे कुठेही गर्दी ही ठरलेलीच आहे. अशा स्थितीत आपल्याकडे शालेय स्तरापासून गर्दी व्यवस्थापनाचे धडे दिले गेले पाहिजेत. यासह मोठ्या धार्मिक कार्यक्रमांसाठी गर्दी व्यवस्थापन आराखडा सिद्ध करणे प्रशासनासाठी बंधनकारक केले पाहिजे. प्रवेश आणि निर्गमन मार्ग वेगळे ठेवणे, ठराविक क्षमतेनुसारच भाविकांना प्रवेश देणे, 'असेंब्लिंग पॉईंट्स' असणे आणि आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित बाहेर पडण्याची व्यवस्था असणे अत्यावश्यक आहे. सीसीटीव्ही, ड्रोन, डिजिटल टोकन प्रणाली यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर वाढवला पाहिजे. पोलीस आणि स्वयंसेवक यांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवले पाहिजे. यासह भाविकांमध्येही जनजागृती केली पाहिजे. अफवा रोखण्यासाठी तात्काळ माहिती देणारी आणि जनतेशी संवाद साधणारी यंत्रणा उभी केली पाहिजे, तसेच अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी विशेष कायदेशीर प्रावधाने लागू केली पाहिजेत. योग्य नियोजन, दायित्वाची जाणीव, शिस्तबद्धता आणि प्रामाणिक कार्यवाही असेल, तर अशा घटना सहज टाळता येतील!

# अशा मदरशांना टाळे का ठोकू नये?

उत्तरप्रदेशमधील ५५८ मदरशांमध्ये विद्यार्थ्यांच्या 'माध्यान्ह आहार योजने'त मोठ्या प्रमाणात अपहार झाला आहे. मदरशांनी योजनेतील निधी हडपल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी 'माध्यान्ह आहार प्राधिकरणा'च्या संचालिका मोनिका राणी यांनी चौकशीचा आदेश दिला. याविषयी 'अखिल भारतीय पसमांदा समाज मंचा'ने तक्रार केली होती. सरकारी निधीचा अपहार करून तो वैयक्तिक लाभासाठी वापरला जात असल्याचे मंचाच्या लक्षात आले. त्यामुळे हे अन्नधान्य आणि निधी विद्यार्थ्यांपर्यंत पोचतच नाही. ५५८ मदरशांवर या प्रकरणी कारवाई होणार आहे. हा निधी खरोखर वैयक्तिक लाभासाठी वापरला जातो कि आतंकवादी कृत्यांसाठी गुंतवला जातो? याचेही अन्वेषण व्हायला हवे; कारण आजवर अनेकदा मदरशांच्या संदर्भातील निधी अपहाराच्या प्रकरणात 'आतंकवाद' हा मूलभूत घटकच समोर आला आहे. चौकशीनंतर सत्य उघड होईलच; पण मदरशांचे हे वास्तव गंभीर आहे. आज नव्याने प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांतूनही इस्लामी मनोवृत्तीची झलक पहायला मिळते. कोणता निधी कुठे आणि कसा वळवायचा? याचेही वास्तव दाखवले जाते. त्यामुळे जनता दूधखुळी राहिलेली नाही. इस्लामी धार्मिक स्थळांचे खरे रूप जनतेच्या समोर येत आहे, हे इस्लामवाद्यांनी लक्षात घ्यावे. एखाद्या योजनेचा निधी हडपला जातो, तेव्हा समाजातील घटक पुढे येऊन अशा गैरप्रकारांच्या विरोधात आवाज उठवतातच; पण प्रशासन नावाची यंत्रणा अशा वेळी काय करत असते? प्रशासनाची देखरेख व्यवस्था इतकी कमकुवत कशी होते? कि प्रशासनही या इस्लामवाद्यांच्या हातातील बाहुले झालेले असते? प्रशासनाच्या स्तरावरील या त्रुटींची चौकशी व्हायला हवी. आजचे युग जरी डिजिटल असले, तरी केवळ कागदोपत्री असलेल्या नोंदींवर अवलंबून न रहाता प्रत्येक गोष्टीची सुनिश्चिती करणे क्रमप्राप्त आहे. तसे झाल्यासच अशा प्रकारांना आळा घालता येईल. सर्व मदरशांची नोंदणी झाली आहे का? त्यांचे नियमित लेखापरीक्षण केले जाते का? यांचीही चौकशी करायला हवी. हा केवळ शैक्षणिक स्तरावरील प्रश्न नसून धार्मिक दृष्टीकोनातूनही याकडे बघायला हवे. शेकडोंच्या संख्येतील मदरशांवर इतक्या मोठ्या प्रमाणात आरोप होऊनही हा विषय ना कुठे मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झाला, ना कुठल्या वृत्तवाहिनीवर याविषयी चर्चासत्रे आयोजित करण्यात आली! कुणी याविषयी एक अवाक्षरही काढत नाही. थोडक्यात काय,



तर मदरशांतील कुकृत्ये दाबली जातात, हेच खरे! निधर्मी देशात अल्पसंख्यांकांच्याच तुष्टीकरणाचा ठेका घेतला जातो, त्याला बहुसंख्य तरी काय करणार?

काही महिन्यांपूर्वीच उत्तरप्रदेश सरकारने सर्व मदरशांच्या आर्थिक व्यवहारांच्या चौकशीचा निर्णय घेतला होता. ४ सहस्र मदरशांना मिळणाऱ्या विदेशी निधीचीही यात चौकशी केली जाणार होती. काही ठिकाणी तर उत्पन्नाचा स्पष्ट स्रोत नाही; पण भव्य मदरसे उभारले गेले, याच्याही चौकशीचे आदेश होते; पण एका मौलवींनी याला लगेच विरोध केला होता. प्रत्येक वेळी मदरशांनाच लक्ष्य केले जात असल्याचा मुसलमानांचा आरोप असतो; पण हा केवळ कांगावा असतो किंवा त्यात साळसूदपणाचा आव आणला जातो, हे उघड आहे. कोणताही अपहार, घोटाळा, घातपाती कृत्य किंवा आतंकवादी आक्रमण असो, यात मदरशांचा किती सहभाग होता, ते आजवरच्या अनेक घटनांतून समोर आलेले आहे. ते वास्तव कुणीच नाकारू शकत नाही. जम्मू-काश्मीरमध्ये जानेवारी २०२६ मध्ये पोलिसांनी मशिदी आणि मदरसे यांची सखोल माहिती गोळा करण्याची मोहीम हाती घेतली होती. ही वेळच का आली? तर ह्यमशिदी आणि मदरसे यांना कुठून पैसा येतो अन् त्यांचा विनियोग कुठे होतो?ह्व, हे जाणून घ्यायचे असल्याचे पोलिसांनी सांगितले. जर धार्मिक स्थळांचा गैरवापर होत असेल, तर देशाच्या दृष्टीने ते घातक आहे. अशांवर कुणी बंदीची मागणी केल्यास चुकले कुठे?

मध्यप्रदेशातील २७ मदरशांमध्ये हिंदु मुलांच्या बेकायदेशीर धर्मांतराचा प्रयत्न करण्यात येत होता. ५५६ हिंदु मुलांना इस्लाम स्वीकारण्यासाठी लक्ष्य केले जात होते. अनेक मदरशांवर बेकायदेशीर परदेशी निधी मिळवण्याचे आणि राष्ट्रविरोधी घटकांशी संबंध असल्याचे गंभीर आरोप करण्यात आले. मदरशांतील मौलवींकडून मुलांवर केले जाणारे लैंगिक अत्याचारही यात अंतर्भूत आहेत. मशिदी आणि मदरसे यांना अनेकदा जिहादी आतंकवादाचे अन् हिंदूंच्या धर्मांतराचे केंद्र म्हटले जाते. याची अनेक वृत्ते सर्वत्र प्रसारितही झाली आहेत. आधुनिक पद्धतीची शस्त्रास्त्रे अशा ठिकाणी सापडतात. त्यांचा वापर हिंदूंवरील आक्रमणासाठी केला जातो. थोडक्यात काय, तर मदरशांमधील अपप्रकारांची शृंखला संपतच नाही. तत्कालीन काँग्रेस सरकारने आजवर मदरशांचे अतोनात लाड केल्याचाच हा परिणाम आहे. योगी शासन या लाडाचे आता फटक्यांमध्ये रूपांतर करतच आहे; पण काँग्रेसने पेरलेली विषवल्ली नष्ट होण्यास वेळ लागेल. किमान भारत सरकारने अशा ठिकाणी दिले जाणारे अनुदान तरी रोखावे.


खरेतर भारतात मदरसा शिक्षणपद्धतीची आवश्यकता तरी आहे का? याचाही विचार व्हायला हवा; कारण मुसलमान सोडून अन्य धर्मियांच्या धार्मिक स्थळांमधून शिक्षणपद्धत राबवली जात नाही. मग ही मोकळीक केवळ मशिदी आणि मदरसे यांनाच का? मदरसे हे शिक्षणकेंद्र नसून केवळ धार्मिक परंपरा शिकवण्याची ठिकाणे आहेत. लोकशाही म्हणवल्या जाणाऱ्या भारतात यावर विचार व्हायला हवा, अन्यथा अशा मदरशांवर तरी बंदी घालायला हवी. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा यांनी तेथील ८०० अनधिकृत मदरसे बंद केले. अशा स्वरूपाची कारवाई अन्य राज्यांतही व्हायला हवी.

आजवर हिंदूंनी ते बहुसंख्य असतांनाही स्वातंत्र्योत्तर भारतात प्रचंड अन्याय-अत्याचार सहन केले; पण 'अल्पसंख्य' म्हणून ओरड करणाऱ्यांनी नेहमीच सगळे ओरबाडून घेण्याचा प्रयत्न केला, जो आजवरही अखंड चालू आहे. हे चक्र दशकानुदशके चालूच आहे. याकडे शासनकर्त्यांनी लक्ष द्यावे.

ह्यमाध्यान्ह आहार योजनेह्वतील अपहार हे केवळ निमित्त आहे. अशी नानाविध कारणे दिवसागणिक समोर येत रहातीलच. प्रश्न आहे तो त्यांच्यावरील नियंत्रणाचा! यामागे कार्यरत असलेल्या इस्लामवाद्यांच्या मोठ्या यंत्रणेवर कठोर कारवाईची आवश्यकता आहे. योगी आदित्यनाथ शासन ठरवलेल्या उपाययोजना नक्कीच कार्यान्वित करील, अशी जनतेला अपेक्षा आहे. देशाची एकात्मता, सुरक्षितता आणि विकास यांना बाधा आणणाऱ्या घटकांवर बंदी आणायला हवी. शैक्षणिक आणि धार्मिक संस्थांचा वापर जर अपारदर्शक आणि देशद्रोही कारवायांसाठी होत असेल, तर ते राष्ट्रहितविरोधीच आहे. राष्ट्रनिष्ठा, कायद्याचे पालन आणि पारदर्शकता यांच्या चौकटीतच देशहितावह कार्य केले गेले पाहिजे. यातूनच सशक्त, सुरक्षित आणि आत्मनिर्भर भारताची निर्मिती होईल!

# तमिळनाडूत सत्तांतर होणार?

तमिळनाडूमध्ये नव्याने स्थापन झालेल्या तमिळगा वेत्तरी कळघम् (टीव्हीके झ्र तमिळनाडू विजय पक्ष) पक्षाने सर्वच्या सर्व म्हणजे २३४ जागांवर त्याचे उमेदवार घोषित केले आहेत. पक्षाचे सर्वेसर्वा आणि अभिनेते जोसेफ विजय यांनी एका कार्यक्रमात या उमेदवारांची घोषणा केली. त्या वेळी ३० वर्षे त्यांच्या वाहनाचे चालक असणारे राजेंद्रन् यांचा मुलगा सबरीनाथन् यांना उमेदवारी घोषित करण्यात आली. त्या वेळी सबरीनाथन् भावूक झाले आणि त्यांनी विजय यांना वाकून नमस्कार केला. या क्षणाचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला आहे. 'तमिळनाडूमध्ये द्रमुक आणि अण्णाद्रमुक या पक्षांना कुणी टक्कर देऊ शकतो, तर तो विजय यांचा पक्ष', अशी हवा सध्या राज्यात निर्माण झाली आहे. तमिळनाडूमध्ये विजय यांचा पुष्कळ मोठा चाहतावर्ग आहे. त्यांच्या मतांवर स्वार होऊन तमिळनाडूच्या राजकारणात उंच भरारी मारण्याचा विजय यांचा मानस आहे. त्यामुळे विजय यांनी सबरीनाथन् यांना आलिंगन देतांना, त्यांचे अश्रू पुसतांना आदी कृतींद्वारे लोकांच्या भावनांना हात घातला आहे. सध्यातरी 'सामान्य लोकांना महत्त्व देणारा आणि त्यांच्या अडचणींना प्राधान्य देणारा नेता', अशी विजय यांची प्रतिमा निर्माण होत आहे. या निवडणुकीत विजय यांनी त्रिची पूर्व आणि पेरंबूर या मतदारसंघांतून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. हे दोन्ही द्रमुकेच बालेकिल्ले आहेत. त्रिची पूर्व हा शहरी भाग असून तेथे ख्रिस्त्यांची संख्या लक्षणीय आहे. अगदी अलीकडच्या काळापर्यंत केवळ 'विजय' हे नाव लावणारे सध्या 'जोसेफ विजय' असे पूर्ण नाव का लावत आहेत? याचे गुपित त्रिची पूर्व येथील लोकसंख्येच्या समीकरणामुळे लोकांसमोर उघड झाले असेल. अण्णाद्रमुक आणि भाजप यांनी विजय यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये सामावून घेण्यासाठी प्रयत्न केले होते, अशा बातम्या होत्या; मात्र विजय यांनी



प्रस्ताव स्वीकारला नाही. त्यांनी राज्यात स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचे निश्चित केले. एका कसलेल्या राजकारण्याप्रमाणे ते राजकारणात त्यांची पावले टाकत आहेत. पहिल्याच फटक्यात त्यांना सत्तेची चव चाखायला मिळेल का ?

वास्तविक गेली अनेक दशके तमिळनाडूचे राजकारण द्रमुक आणि अण्णाद्रमुक या पक्षांच्या अवतीभोवती फिरत आहे. तमिळनाडू तसा पुरो(अधो)गामी, सुधारणावादी, धर्मनिरपेक्षतावादी थोडक्यात हिंदुद्वेष्ट्यांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे काँग्रेसने येथे पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न केला; मात्र ती अपयशी ठरली. भाजपने हिंदुत्वाचे सूत्र उपस्थित करून तेथे पाय रोवण्याचा प्रयत्न केला; मात्र तमिळी लोकांची नस त्याला पकडता आली नाही. जे भाजप आणि काँग्रेस यांना जमले नाही, ते टीव्हीके करून दाखवणार का? विजय यांनी 'या वेळची निवडणूक ही द्रमुक विरुद्ध टीव्हीके अशी आहे', असे स्पष्ट केले आहे. अण्णाद्रमुक वगैरे त्यांच्या खिजगणतीतही नाहीत. काही राजकीय तज्ज्ञांच्या मते या वेळच्या विधानसभा निवडणुकीमध्ये हा पक्ष राजकीय अंदाज पालटू शकतो. भारतीय जनतेचे लक्ष सध्या बंगाल आणि आसाम राज्यांमधील निवडणुकीकडे लागले आहे; मात्र त्यासह तमिळनाडूची निवडणूक आणि त्याचा निकालही भारतीयांसाठी विशेषतः हिंदुंसाठी महत्त्वाचा आहे. हिंदु धर्म मिटवून टाकण्याची भाषा करणाऱ्या द्रमुकला पुन्हा सत्तेत बसवायचे कि धर्मनिरपेक्षतेची झूल पांघरून अल्पसंख्यांकांच्या हितासाठी लढण्याची भाषा करणाऱ्या टीव्हीकेला आपलेसे करायचे? कि हिंदुहिताचा निर्णय घेणाऱ्या उमेदवारांना सत्तेत आणायचे', हे तमिळी जनतेने ठरवायचे आहे. या निवडणुकीत तमिळनाडूचे खऱ्या अर्थाने भवितव्य ठरणार आहे.

तमिळनाडूत अभिनेत्यांचा राजकारणात प्रवेश, ही काही नवी गोष्ट नाही. एम्.जी. रामचंद्रन्, जयललिता, विजयकांत यांनी तमिळी राजकारणावर प्रभाव टाकला. त्यानंतर कमल हासन यांनी राजकारणात नशीब आजमावून पाहिले; मात्र त्यांना म्हणावे तसे यश मिळाले नाही. त्यानंतर आता विजय ही परंपरा चालू ठेवतील का ? तमिळनाडूमध्ये जयललिता यांच्या निधनानंतर त्यांच्यासारखा खमका राजकारणी राजकीय पटलावर दिसून येत नाही. द्रमुकच नव्हे, तर अण्णाद्रमुककडेही असा चेहरा नाही. 'ही पोकळी विजय भरून काढू शकतात', असाही एक अंदाज वर्तवला जात आहे. विजय यांनी अभिनेते म्हणून त्यांच्या कामाला आरंभ केल्यावर त्यांच्याकडे 'ठोकळेबाज अभिनेता' म्हणून पाहिले गेले; मात्र हळूहळू अभिनयाला विनोदाची झालर देऊन त्यांनी तमिळी चित्रपटक्षेत्रात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. २७ सप्टेंबर २०२५ या दिवशी टीव्हीकेच्या स्थापनेची घोषणा करण्यासाठी करूर येथे आयोजित सभेसाठी साधारण ६० ते ७० सहस्र लोकांचा जमाव कार्यक्रमस्थळी जमा झाला होता. त्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये ४१ लोक ठार झाले, ही गोष्ट वेगळी; मात्र या घटनेनंतर 'विजय यांच्या मागे जनसमुदाय आहे', हे त्या वेळी अन्य राजकीय पक्षांच्याही लक्षात आले होते. त्यामुळे विजय यांना कुणीही हलक्यात घेण्याची चूक करणार नाही. त्याचाच एक भाग म्हणून 'विजय यांना त्यांची प्रत्येक रॅली (मिरवणूक) किंवा सभा यांची अनुमती घेण्यासाठी सरकारी कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागत आहेत', अशा तक्रारी पक्षाचे कार्यकर्ते करत आहेत. 'टीव्हीके'ला अशा प्रकारे त्रास देण्याचा प्रकार सत्ताधारी द्रमुककडून आतापासूनच चालू झाला आहे.

'तमिळनाडूमध्ये द्रमुक, अण्णाद्रमुक किंवा टीव्हीके असा कोणताही पक्ष सत्तेत आला, तरी त्याचा हिंदूंना काय लाभ होणार?', हा कळीचा प्रश्न आहे. तमिळनाडूच्या राजकारणावर आजही पेरियार यांच्या कुविचारांचा प्रभाव आहे. त्यामुळे वेगळी तमिळी संस्कृती, भाषा आणि आचार-विचार यांच्या दुष्प्रभावाद्वारे तेथील तमिळी जनतेला हिंदु धर्म, संस्कृती आणि परंपरा यांपासून विलग करण्याचे जे षड्यंत्र चालू आहे, ते आजतागायत चालू आहे. त्यातच तमिळी जनता व्यक्तीनिष्ठतेच्या आहारी जाते, हा इतिहास आहे. चित्रपटांतून कलाकारांचे जे वास्तविकतेपेक्षा भव्य-दिव्य रूप दाखवले जाते, त्यावर जनता विश्वास ठेवते आणि 'हे कलाकार वास्तवातही असे काहीतरी भव्य दिव्य कृती करतील', अशी भाबडी आशा बाळगून या अभिनेत्यांपासून राजकारणी बनलेल्या लोकांच्या मागे धावते. मागील अनेक दशकांप्रमाणे या वेळीही मतदार खोट्या तमिळी अस्मितेच्या प्रभावाखाली येऊन मतदान करणार कि हिंदुहित आणि राष्ट्रहित यांना प्राधान्य देणार?, हे येणाऱ्या काही दिवसांत समोर येईलच!



# नियमांच्या जंजाळात शैक्षणिक क्षेत्र!

**शाळा प्रवेशाच्या संदर्भात नियम करताना त्याचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांचा समावेश वाढवण्याचा असला पाहिजे, विद्यार्थ्यांना वगळण्यासाठी नियम केले जाऊ नयेत; पण एक कि.मी. अंतराच्या नियमामुळे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी कायद्यातील या योजनेच्या लाभाला मुकणार आहेत.**

नेमेची येतो मग 'पावसाळा'सारखे जानेवारी-फेब्रुवारी महिना आला की काही ना काही कारणामुळे शिक्षण हक्क कायदा व त्यातील सामाजिक, आर्थिक, वंचित घटकांसाठी असणारे २५ टक्के आरक्षणाचे प्रवेश हा वादाचा मुद्दा गेली दहा-बारा वर्षे सतत होत आहे. असे होण्याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षण धोरणातील अंतर्गत विसंगती हे आहे. एका बाजूला शिक्षणाचे खासगीकरण करणे, विनाअनुदानित खासगी शिक्षणाला मुक्त स्वातंत्र्य देणे, शासनाने जनतेला शिक्षण देण्याची आपली जबाबदारी शिक्षण सम्राटांवर सोपवणे, तर दुसऱ्या बाजूला शिक्षण धोरणातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करणे व किमान याचा आभास निर्माण करणे, त्यासाठी अनेक त्रुटीने परिपूर्ण असलेला 'बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायदा २००९'ची अंमलबजावणी करण्याचा खटाटोप करणे ही धडपड दरवर्षी महाराष्ट्रात शिक्षण खात्याला करावी लागत आहे व ही तारेवरची कसरत ठरत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणात जातीवर आधारित भेदभाव नष्ट करण्यासाठी व समता संवर्धनासाठी 'प्रमोशन ऑफ इक्विटी इन हायर एज्युकेशन इन्स्टिट्यूशन रेग्युलेशन २०२६' हे विधेयक १३ जानेवारी २०१६ रोजी मंजूर केले होते. त्याला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली; पण जातीवर आधारित भेदभाव हा केवळ उच्च शिक्षणात होत नाही तर तो शालेय शिक्षणातही होत असतो. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्र शासनाने २५ टक्के मुलांच्या प्रवेशासाठी लागू केलेली एक कि.मी.ची अट हे आहे. 'शिक्षण हक्क कायदा २००९' हा आदर्श आहे असे अजिबात नाही; पण त्यात अशी तरतूद आहे की, प्रामुख्याने खासगी व विनाअनुदानित शाळा त्यांच्या एकूण पहिलीच्या प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा सामाजिक मागासलेल्या घटकांसाठी म्हणजे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, भटक्या व विमुक्त जातीसाठी आणि आर्थिक दुर्बल वर्गासाठी राखीव ठेवतील. या मुलांची शुल्क प्रतिपूर्ती शासन करेल व या संस्था मुलांना मोफत शिक्षण देतील. मुळातच ही 'व्हाऊचर सिस्टीम' अयोग्य आहे; पण शिक्षण चळवळीचा विरोध डावलून भारत सरकार या योजनेची अंमलबजावणी करत आहे. वृत्तपत्रातील बातम्यांनुसार महाराष्ट्र शासनाकडून शिक्षण संस्थांना शुल्क प्रतिपूतीर्ची थकीत रक्कम सुमारे रु. २५०० कोटी आहे. शुल्क प्रतिपूतीर्चा हा बोजा शासनाला डोकेदुखी होत आहे व ही जबाबदारी टाळण्यासाठी अलीकडे शासन निरनिराळ्या युक्त्या शोधत असते. उदा. २०२४ मध्ये शिक्षण हक्क कायद्यातील कलमांचा चुकीचा अर्थ लावून २५ टक्क्यांचे प्रवेश केवळ सरकारी शाळेत दिले जातील असा नियम शासनाने केला; पण हा कायद्याचा चुकीचा अर्थ आहे. म्हणून अ.भा. समाजवादी अध्यापक सभा व इतर संघटना, पालकांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात गेल्या. न्यायालयाने पालकांची बाजू ग्राह्य मानली व शासनाचा आदेश रद्द केला. आता २०२६-२७ साठी शासनाने नियम केला की, २५ टक्के आरक्षणाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या घराच्या एक कि.मी. परिसरातील शाळेतच प्रवेश मिळेल व विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना दहा शाळांचे पर्याय दिले पाहिजेत. हा शासन निर्णय १२ फेब्रुवारी २०२० रोजी जाहीर झाला व १७ फेब्रुवारी २०२६ पासून शिक्षण खात्याने प्रवेश प्रक्रिया नव्या नियमाने सुरू केली. नव्या नियमाबद्दल पालकांना, जनतेला काय वाटते हे मांडायला वेळ न देता, घाईघाईने नियमाची अंमलबजावणी करणे हे मुळात लोकशाहीविरोधी आहे व ही घाई शंका निर्माण करणारी आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ह्लची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून म्हणजे २०१२-१३ पासून २०२५-२६ पर्यंत पालकांना त्यांच्या घरापासून एक ते तीन कि.मी. किंवा त्यापेक्षा पुढच्या अंतराच्या शाळा त्यांच्या पसंतीनुसार निवडण्याची संधी असायची व विद्यार्थ्याला शाळा देताना अग्रक्रमाने प्रथम एक, नंतर दोन, नंतर तीन व नंतर त्या पुढच्या कि.मी.च्या शाळा दिल्या जायच्या आणि या पद्धतीबद्दल कोणाची तक्रार नव्हती! या नियमाचा फायदा असा होता की पालकांना शाळा निवडीला जास्त पर्याय उपलब्ध होते. त्यामुळे सुमारे तीन लाखांपर्यंत प्रवेश अर्ज यायचे; परंतु या वर्षी एकूण परिस्थिती पाहता केवळ दोन लाखांपर्यंत प्रवेश अर्ज येतील, असे वाटते. नव्या नियमाचे दोन प्रमुख परिणाम होत आहेत. एक, अनेक पालकांना एक कि.मी. परिसरात एकही शाळा दिसत नाही. हा प्रश्न शहरी भाग सोडून थोडे पुढे गेले की, जास्त गंभीर होत आहे. यामुळे हजारो पालकांना प्रवेश अर्ज भरण्याची संधी मिळालेली नाही. दोन, काही भागात एक कि.मी. परिसरात शाळा दिसल्यास तर त्या एक दोनच असतात, मग दहा शाळांचे पर्याय पालकांनी द्यायचे कसे? एक कि.मी.च्या नियमाचे समर्थन करताना शिक्षण खात्याकडून असे सांगितले जात आहे की, वर्ग पहिली ते पाचवीसाठी शाळा मुलाच्या घरापासून चालत जाण्याच्या अंतरात म्हणजे एक कि.मी.मध्ये असावी व वर्ग सहा ते आठसाठी शाळा तीन कि.मी. परिसरात असावी असे २०१० च्या नियमावलीत म्हटले आहे. कायद्याचा तांत्रिक मुद्दा काढायचा झाला तर वरील अंतरात शाळा स्थापन करण्याची अट कायद्याने शासनावर टाकली आहे. विद्यार्थ्यांनी या अंतरातीलच शाळेत जावे, अशी सक्ती कायद्याने केलेली नाही. घर व शाळा यातील अंतराचे कायदेशीर मुद्दे बाजूला ठेवले तरी प्राथमिक शिक्षणासाठी परिसरात शाळा एक कि.मी. अंतरात चालत जाणे इतकी जवळ असावी व उच्च प्राथमिक शिक्षणासाठी शाळा तीन कि.मी. परिसरात असावी हे तत्त्वतः योग्य आहे. आमचा त्याला पूर्ण पाठिंबा आहे, पण मुद्दा असा आहे की, ही अट केवळ २५ टक्क्यांच्या मुलांना का लागू करता? त्या त्या परिसरातील सर्व जाती, धर्म, पंथ, गरीब-श्रीमंत, वेगवेगळी सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांनी एक किमी परिसरातील शाळेतच जावे अशी अट १०० टक्के मुलांना लागू करा. कोठारी आयोगाने म्हटलेल्या 'परिसर शाळा' यातून निर्माण होतील व महाराष्ट्रात समतेची शैक्षणिक क्रांती होईल. असे झाले तर एक कि.मी. अंतराच्या नव्या नियमाचे आम्ही आनंदाने स्वागत करू. पण प्रवेशासाठी केवळ २५ टक्के आरक्षणाच्या विद्यार्थ्यांनाच एक कि.मी. अट लागू करणे म्हणजे भारतीय संविधानाच्या समता व समान संधीच्या तत्त्वांचे, कलमांचे उल्लंघन आहे. हा जातीवर आधारित भेदभाव आहे, असेच म्हणावे लागेल. म्हणून एक कि.मी.ची अट भारतीय संविधान विरोधी आहे. अनेक संघटनांनी सुरुवातीला पालकांच्या वतीने शासनाकडे या संदर्भात व्यावहारिक अडचणी मांडण्याचा प्रयत्न केला; परंतु शासनाचा प्रतिसाद मात्र असंवेदनशील होता. त्यामुळे नाइलाजाने संघटनांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. नागपूर खंडपीठाकडे एक रिट पिटीशन व एक जनहित याचिका दाखल झाली. उच्च न्यायालयाने प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन लागोपाठ सुनावणी करून अंतराची अट रद्द करण्याचा आदेश १२ मार्च २०२६ रोजी दिला. त्यानुसार शिक्षण खात्याने १६ मार्च २०२६ रोजी नवा आदेश काढला. त्यात ज्या पालकांना एक कि.मी. अंतरात एकही शाळा दिसत नव्हती व म्हणून त्यांनी प्रवेशाचा अर्ज भरला नाही त्यांना आता अंतराची अट रद्द केल्यामुळे परत अर्ज भरता येईल व त्यांना ज्यादा शाळेचे पर्याय उपलब्ध होतील. थोर शिक्षणतज्ञ जे. पी. नाईक म्हणाले होते की, ''भारतात शिक्षण धोरण जनतेला शिक्षण देण्यासाठी तयार केले जाते हे समजणेच चूक आहे. भारतात शिक्षण धोरण जनतेला शिक्षण नाकारण्यासाठी तयार केले जाते हे म्हणणे जास्त योग्य आहे.'' भारताच्या शिक्षण धोरणाला जे. पी. नाईकांचे हे निरीक्षण पूर्णपणे आजही लागू पडत आहे.

# चेहरा आरोग्याचा आरसा

**आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेहऱ्याची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुर्वेदासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ॲक्युपंक्चर किंवा ॲक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.**

**आयुर्वेदामध्ये** जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेहऱ्याची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेहऱ्याच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेहऱ्यावर उमटते आणि चेहऱ्यावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेहऱ्यावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.





काही लोकांच्या चेहऱ्यावर मानेच्या मागे त्वचा ङ्किकट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्यचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेहऱ्यावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

# पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

**चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई ! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....**

■ **शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते-** पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने हृद्यविकाराचा धोका संभवतो.

■ **वजन घटवण्यास मदत होते-** एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

■ **रोगप्रतिकारशक्ती वाढते-** आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

■ **मधुमेहींसाठी गुणकारी-** पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ 8.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

■ **डोळ्यांचे आरोग्य सुधारते-** पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

■ **सांधेदुखीपासून आराम मिळतो-** पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

■ **पचन सुधारते-** आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

■ **मासिक पाळीचा त्रास कमी होतो-** अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.

■ **कर्करोगापासून बचाव होतो-** पपईमधील ॲन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

■ **ताण-तणाव कमी होतो -** दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.



# शेवभाजी



**साहित्य** – शेव २ कप भरून, १ मोठा कांदा, अर्धी वाटी खोबऱ्याचा किस, ८/९ लसूण पाकळ्या, अर्धा इंच आले, आवडीप्रमाणे लाल तिखट किंवा लाल मिरच्या, टिस्पून जिरे, २ टिस्पून धणे, १ टिस्पून गरम मसाला (हा ताजा केला तर चांगले. त्यासाठी मिरी, लवंगा, दालचिनी, वेलची, दगडफूल घ्या.), तेल, फोडणीचे साहित्य (हिंग, हळद, मोहरी), कोथिंबीर, मीठ

**कृती** – लाल मिरच्या घेतल्या असतील तर त्या आणि तर ताजे मसाले खमंग भाजून घ्या. व त्याची पूड करा. खोर्बयाचा किसही भाजून घ्या. कांदा उभा चिरून तेलात लालसर परतून घ्या. (हल्ली वाळवलेला कांदा मिळतो. तो वापरला तर पटकन भाजला जातो. तो २ टेबलस्पून पुरेल). खोबरे, आले, लसूण व कांदा यांचे बारीक वाटण करा. (मिक्सरमधे आधी खोबरे आणि मग कांदा, आले, लसूण वाटावे लागेल.) या वाटणात मसाला मिसळा. थोड्या तेलाची फोडणी करून त्यात मसाला परतून घ्या. त्यात हवे तेवढे पाणी घालून रस्सा उकळू द्या. बेताचे मीठ व कोथिंबीर घाला. (शेवेत मीठ असतेच, त्या मानाने मीठ घाला.) पाणी थोडे जास्तच घाला कारण शेव घातल्यावर रस्सा दाट होतो. अगदी खायच्या वेळेला त्यात शेव टाका आणि २/३ मिनिटे उकळा. भाकरी किंवा चपाती सोबत खा.

# दुधाचे नियमित सेवन आरोग्यास हितकारक आहे का?

**लहानपणापासून सर्वांना दररोज किमान एक ग्लास दूध पिण्याची सवय आपल्या आईने लावलेली आहे. कोणी आनंदाने, तर कोणी दूध आवडत नाही, तरी आईच्या आग्रहाखातर प्यावे लागते म्हणून दूध पीत असतो. दूध आपल्या आहाराचा अविभाज्य भाग आहे. दुधाच्या नियमित सेवनाने आरोग्य चांगले राहते, असे म्हटले जाते. पण हृदयरोग होण्याची शक्यता, लठ्ठपणा इत्यादी विकार दुधाच्या सेवनाने होतात, असेही काहींचे म्हणणे आहे. त्यामुळे आपल्या आहारातील महत्त्वपूर्ण घटक असलेल्या दुधाचे नियमित सेवन योग्य आहे किंवा नाही, याचा विचार करणे अगत्याचे ठरत आहे. याबाबतीत आहारतज्ज्ञांची मते विचारात घेणे योग्य ठरेल.**

**आहारतज्ज्ञांच्या** मते, दूध हे पूर्ण आहार आहे. तसेच दूध अतिशय पौष्टिक असून त्यामध्ये प्रथिने, कॅल्शियम, अ, बी-१२ आणि रिबोफ्लाविन ही जीवनसत्त्वे आणि पोटॅशियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम, झिंक हे क्षार आहेत. ही सर्व पोषक तत्त्वे दुधामध्ये आहेत. मात्र दुधामध्ये लोह आणि क जीवनसत्त्व ही दोन पोषक तत्त्वे नाहीत. त्यामुळे लोह आणि क जीवनसत्त्व असलेले इतर अन्नपदार्थ दुधाच्या जोडीने आपल्या आहारामध्ये समाविष्ट करावेत, अन्यथा लोहाच्या कमतरतेमुळे ॲनिमिया होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यामध्ये केवळ एक ग्लास दूध पिणे पुरसे आहे, ही समजूत चुकीची आहे. सकाळचा नाश्ता हा आपल्या दिवसभरातील अन्नसेवनाचा एक मुख्य भाग आहे. त्याद्वारे आपल्या शरीराला मिळणारी ऊर्जा आपल्याला दिवसभराच्या कामासाठी ताकद देत असते. त्यामुळे यावेळी आपल्या आहारात कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे आणि फायबर या सर्व पोषक तत्त्वांचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यामुळे ही सर्व पोषक द्रव्ये आपल्याला मिळतील असा नाश्ता दुधाच्या जोडीने घ्यायला हवा. तसेच रात्रभराच्या झोपेनंतर शरीराला काही प्रमाणात ग्लुकोजची देखील आवश्यकता असते. त्यामुळे दूध, त्याच्या जोडीला कॉर्नफ्लेक्स, किंवा ओट्स, एखादे फळ असा नाश्ता दिवसाला सुरुवात करताना असायला हवा.

दुधामध्ये हाडांच्या व दातांच्या आरोग्यासाठी कॅल्शियम असते. पण दुधाखेरीज इतर अनेक पदार्थ असे आहेत ज्यांच्यामध्ये दुधाइतकेच किंवा त्याहीपेक्षा जास्त मात्रेमध्ये कॅल्शियम असते. पांढरे तीळ, नाचणी, राजमा आणि सोयाबीन हे पदार्थ कॅल्शियमचे उत्तम स्त्रोत आहेत. शंभर ग्रॅम पांढऱ्या तीळामध्ये सुमारे १३०० ते १४०० मिलीग्रॅम कॅल्शियम आहे, तर शंभर मिलीलिटर दुधामध्ये केवळ २०० ते ३०० मिलीग्रॅम कॅल्शियम आहे. त्यामुळे शरीराची कॅल्शियमची गरज पूर्ण करण्यासाठी केवळ दूधच गरजेचे आहे असे नाही. त्यामुळे ज्यांना दूध आवडत नाही, त्या व्यक्तींनी कॅल्शियमसाठी आपल्या आहारामध्ये तीळ, नाचणी इत्यादी पदार्थांचा समावेश करावा. घरामध्ये लहान मुलांपासून ते वृद्ध मंडळींपर्यंत सर्वांनी नियमित दूध प्यायलाच हवे, असा आग्रह सोडायला हवा. वयाच्या बाराव्या वर्षांनंतर दूध पिण्याला इतर पर्यायही उपलब्ध करून द्यायला हवेत. दुधाशिवाय सुका मेवा, तीळ, नाचणी इत्यादी पदार्थांचा आहारामध्ये नियमित समावेश करायला हवा. यामुळे शरीराला आवश्यक ते पोषक घटक मिळतीलच, शिवाय शरीराची रोगप्रतिकारशक्ती देखील चांगली राहील. सुक्या मेव्यामध्ये दुधापेक्षा प्रथिने अधिक आहेत, तर तीळामध्ये दुधापेक्षा अधिक मात्रेमध्ये कॅल्शियम आहे.

वाढत्या वयामध्ये दूध प्यायल्याने अपचन, पोट फुगणे, पोट बिघडणे अशा तक्रारी उद्भवू शकतात. यालाच लॅक्टोज इनटॉलरन्स असे म्हटले जाते. पण पुष्कळदा हे त्रास दुधामुळे उद्भवत आहेत, हे लक्षात यायलाच वेळ लागतो. पण एकदा ही गोष्ट लक्षात आली की दुधाचे सेवन थांबवले जाते, आणि त्याचबरोबर हे त्रासही थांबतात. त्यामुळे पोषणासाठी केवळ दुधावर अवलंबून न राहता, आपला आहार चौरस असेल, याची काळजी घ्यावी.

# दुधी भोपळ्याचा रस अतिप्रमाणात घेतल्यास होऊ शकते आरोग्यहानी

**दुधी** भोपळ्याचा रस आरोग्यासाठी खूपच लाभदायी आहे आणि हा रस नियमित सेवन केल्याचे फायदेही खूप आहेत. या रसाच्या सेवनाने वजन कमी करणे, पित्त कमी करणे, हृदय विकार, मधुमेह नियंत्रित करणे आणि रोगप्रतिकारशक्ती वाढणे, यांसारखे अनेक फायदे मिळतात. मात्र या रसाचे प्रमाणाबाहेर सेवन केले जात असेल तर हे फायदे दूर, उलट आरोग्याची हानी होण्याची शक्यता अधिक वाढते, असा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे.

या रिपोर्टनुसार, सकाळी उपाशीपोटी दुधीचा रस फायदेशीर आहे. पण अतिप्रमाणात हा रस घेतला तर त्याचे तोटे आहेत. कच्च्या दुधीचा हा रस उपाशीपोटी अतिप्रमाणात प्यायल्यास पोटासाठी ते धोकादायक ठरते. कारण हे भोपळे आकाराने मोठे व्हावेत म्हणून त्यावर पेस्टीसाईड फवारली जातात किंवा भोपळ्यात ऑक्सिटोसीन या द्रव्याची इंजेक्शन्स दिली जातात. यामुळे अनेकांना ॲलर्जी येऊ शकते, हातापायांना सूज येऊ शकते, नाक आणि चेहऱ्यावर फोड येऊन खाज सुटू शकते. भूक कमी होते.मधुमेही लोकांनी हा रस अधिक प्रमाणात घेतल्यास रक्तशर्करेचे प्रमाण एकदम कमी होऊन माणूस बेशुद्ध होऊ शकतो. हा रस प्रमाणात घेतल्यास इन्सुलिनची पातळी योग्य राखली जाते पण जादा प्रमाणात घेणे धोकादायक ठरू शकते. दुधीचा रस काढल्यावर तो कडू लागत असेल तर अजिबात पिऊ नये तसेच फार तर एक ग्लास रस इतकेच प्रमाण ठेवावे. काढून ठेवलेला रस पिऊ नये तर दरवेळी ताजा प्यावा, असेही सुचवले जाते.



# गाढ झोप येण्यासाठी करा हे उपाय



**रात्रभर** तुम्ही सतत कूस बदलत असाल, झोप लागत नसेल, किंवा लागलीच तर वारंवार झोपमोड होत असेल, तर अशा वेळी झोप अपुरी राहिल्याने दुसरा दिवस आळसात जातो. कोणत्याही कामाचा उत्साह वाटत नाही. रात्रभराची व्यवस्थित, गाढ झोप शारीरिक आणि मानसिक थकवा घालवण्यासाठी अतिशय आवश्यक आहे. जर ही विश्रांती शरीराला मिळाली, तर शरीरामध्ये काम करण्याचा उत्साह राहतो, मेंदू सचेत राहतो आणि मानसिक तणाव देखील जाणवत नाही. त्यामुळे ज्या व्यक्तींना रात्री झोप लागण्यास त्रास होत असेल, त्यांनी काही उपायांचा अवलंब केल्यास फायदा होऊ शकतो. आपण ज्या खोलीमध्ये झोपत असू, तिथे जर सतत कोणते ना कोणते आवाज येत असतील किंवा बाहेरील प्रकाश जर खोलीमध्ये येत असेल, तर झोपमोड होण्याची शक्यता असते. अशा वेळी आपल्या खोलीमध्ये बाहेरील आवाज किंवा प्रकाश येणार नाही किंवा कमी येईल अशी व्यवस्था करण्याची गरज आहे. तसेच तुमच्या जोडीदाराच्या सततच्या घोरण्याच्या सवयीमुळे वारंवार झोपमोड होत असेल, तर घोरणे कमी होण्यासाठी बाजारामध्ये उत्पादने उपलब्ध आहेत, त्यांचा वापर करता येईल. शांत आणि गाढ झोप येण्याकरिता आजकाल मेमरी फोम गाद्या खूपच लोकप्रिय होत आहेत. या गाद्यांमुळे पाठीच्या कण्याला आधार मिळतो. तसेच स्लीप मास्कच्या वापरामुळे खोलीतील किंवा खोलीबाहेरील प्रकाशाचा त्रास होऊन झोपमोड होणार नाही. रात्री झोपण्यापूर्वी गरम दुधाचे सेवन केल्यासही शांत झोप येण्यास मदत होते.

# तळपायांची काळजी केवळ सौंदर्यासाठी नव्हे, तर आरोग्यासाठीदेखील फायदेशीर

तळपायांना शरीराचं दुसरं हृदय म्हणतात. तळपायांवर गादीसारखा भाग असतो, ज्यावर बरीच छिद्रे असतात. ही छिद्रे आकाराने मोठी असतात. ज्या वेळी आपण चालतो आपल्या शरीराचं संपूर्ण वजन या तळपायांवर पडतं. त्यामुळे ही छिद्रे प्रसरण पावतात. या छिद्रांमधून ऑक्सिजन आत जातो आणि घामाच्या रूपाने आत गेलेली टॉक्सिन बाहेर पडतात. तळपायांवर दाब पडल्यावर रक्तवाहिन्यांवरील दाब वाढू लागतो आणि रक्त वरच्या दिशेने ढकलले जाते. त्यामुळे हे हृदयरोगांच्या रुग्णांना फायदेशीर असतं.

■ **तळपाय** स्वच्छ असल्यास शरीराची त्वचासुद्धा चमकते. तळपाय घाण असल्यास शरीराची त्वचा सुद्धा अस्वच्छ असते. तळपाय नेमाने स्वच्छ केले गेले तर शरीराच्या त्वचेला ऑक्सिजन मिळत राहतो. तसेच शरीरात रक्त प्रवाह सुरळीत राहतो.



■ रात्री झोपण्याआधी आपल्या तळपायांची स्वच्छता करावी. कमीत कमी ३ मिनिटे गरम आणि एक मिनिट थंड पाण्याचा शेक घ्यावा.

■ तळपायांची नेहमी मालीश करावी. तेल आपल्या शरीराच्या प्रकृतीनुसार निवडावे. कोरड्या पडलेल्या तळपायांची व्हॅसलिन आणि चंदनाच्या तेलाने मालीश करावी.

■ मुलांच्या आणि बायकांच्या कोरड्या टाचांना ऑलिव्ह ऑईल, चाल मोगरा (तुवरक), मोहरीचे तेल, व्हॅसलिन आणि लिंबाचा रस टाकून चोळावे. त्याच बरोबर टाचांमध्ये स्पंज कमी झाल्यास किंवा टाचांमधून रक्त येत असल्यास नारळाच्या तेलात शंखपुष्पी मिसळून मालीश करावी.

■ सकाळी अंघोळ करताना तळपाय चोळून चोळून स्वच्छ घासावे. अंघोळीनंतर मोहरीचे तेल लावावे.

■ उंच टाचांच्या चपला आणि जोडे वापरणे टाळावे. हे वापरल्यास रक्त पुरवठा कमी होतो.

■ दररोज कमीत कमी १५ ते २० मिनिटे अनवाणी पायाने गवतावर किंवा ओल्या मातीत चालावे. तळपायाच्या गादीला वाढवण्यासाठी माती किंवा वाळूवर उड्या माराव्यात. असे केल्याने मज्जातंत्रमध्ये वाढ होते आणि हार्मोन्सचा स्त्राव संतुलित होतो.

# हाय हिल्सपासून सावधान!

**उंच टाचांच्या** चपला आणि सँडल वापरण्याची फॅशन चांगलीच रूढ आहे. विशेषतः महिलांमध्ये उंच टाचांच्या चपला वापरल्या जातात. कारण महिलांची उंची मुळात कमी असते. त्यांना आपण अधिक उंच दिसावे, असे वाटत असते. परंतु अस्थिरोग तज्ज्ञांचे असे मत आहे की, उंच टाचांच्या चपला आणि सँडल्स वापरणे हितकारक नाही. अशा प्रकारच्या वहाणा वापरल्याने गुडघ्यावर जास्त भार पडतो आणि गुडघ्याचे सांधे बाधित होतात. म्हणून एक इंचापेक्षा अधिक उंचीच्या चपला किंवा सँडल्स वापरू नयेत, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टर्स देत आहेत.



आपण दिवसभरात वाकतो, डावी-उजवीकडे शरीराला वळवतो आणि आपल्या सांध्यांना निरनिराळ्या प्रकारच्या हालचाली करायला लावतो. या हालचाली तशा सांध्यांसाठी हितकारकच असतात. परंतु त्या नीट केल्या नाहीत तर अधिक नुकसानकारक ठरतात. तेव्हा सांध्यांचा वापर करून कोणतेही काम करताना काही पथ्ये पाळली पाहिजेत आणि आपल्या सांध्यांची ताकद टिकवून ठेवली पाहिजे. त्यासाठी पाळायचे पहिले पथ्य म्हणजे हाय हिल्सना रामराम ठोकणे.

दुसरे पथ्य म्हणजे कोणतीही वस्तू उचलताना उचलल्या जाणाऱ्या वस्तूचा भार पूर्ण पंजावर किंवा जमल्यास पूर्ण हातावर पडेल अशी दक्षता घ्यावी. उचलल्या जाणाऱ्या वस्तूचे वजन केवळ बोटावर तोलण्याचा प्रयत्न केला तर त्याचा अतिरिक्त भार सांध्यांवरही पडतो आणि सांध्याचे नुकसान होते. कॅल्शियमचे सेवन करणे, सुद्धा आवश्यक असते.

# आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सॲप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

**व्हॉट्सॲप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सॲप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.**



**व्हॉट्सॲप** ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सॲप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सॲप ने विंडोजसाठी एक नवीन ॲप आणला आहे. हा ॲप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सॲप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

**मैक ओएस ला ही सुविधा मिळणार**

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टेंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सॲप ॲप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ॲप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

**डेस्कटॉपवर व्हॉट्सॲप कॉल कसा कराल?**

डेस्कटॉपवर व्हॉट्सॲप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सॲप ॲपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.



# पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक

**हेल्दी** राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

■ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

■ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**त्वचेसाठी लाभदायक तूप**

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

# राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू

## उच्चस्तरीय आढावा बैठकीत अहवाल सादर, अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याच्या आरोपांवर शिक्कामोर्तब झाले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत सादर करण्यात आलेल्या १ महिन्याच्या अहवालानुसार, राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. याची दखल घेत परिवहन मंत्र्यांनी संयुक्त कारवाईचा अहवाल सादर करणे बंधनकारक केले असून जबाबदारी टाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

राज्यातील वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मोटार परिवहन विभाग व एसटी महामंडळाची उच्चस्तरीय आढावा बैठक गुरुवारी पार पडली. या बैठकीत राज्यातील सद्यस्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली असून, तातडीने आणि प्रभावी उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले. या बैठकीत सादर करण्यात आलेल्या १ महिन्याच्या अहवालानुसार राज्यात अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू असून, अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यामागील प्रमुख कारणे म्हणजे स्थानिक स्तरावर आदेशांची प्रभावी अंमलबजावणी न होणे, तसेच एसटी व आरटीओ विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः, एसटीकडून कारवाईसाठी उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा काही ठिकाणी गैरवापर होत असल्याचे गंभीर निरीक्षण नोंदविण्यात आले.



**कारवाई अधिक पारदर्शक करण्याचे निर्देश**

एसटीने बेकायदेशीर मार्ग व वाहनांची माहिती नियमितपणे संकलित करून आरटीओ विभागास देणे, संगनमत व गैरप्रकारांविरोधात स्वतंत्र चौकशी समिती नेमणे, तसेच जीपीएस व फोटो रिपोर्टिंगसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून कारवाई अधिक पारदर्शक करण्याचे निर्देशही देण्यात आले.

**काही भागांत दिखाऊ कारवाई**

दर १० दिवसांनी कारवाई अहवाल सादर करण्याचे निर्देश असतानाही अनेक ठिकाणी त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले. काही भागांत केवळ दिखाऊ कारवाई होत असल्याची नोंद करण्यात आली असून, आरटीओ अधिकाऱ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली. यावेळी मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, अवैध वाहतूक रोखण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करणे अत्यावश्यक आहे. एसटीकडून उपलब्ध करून दिलेल्या वाहनांचा वापर केवळ कारवाईसाठीच करण्यात यावा आणि त्याचा कोणताही गैरवापर सहन केला जाणार नाही.

## राज्यात ई-वाहनांना चालना
# शासनाकडून कोट्यवधींचा निधी वितरीत

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवून पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला गती देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण-२०२५ अंतर्गत विविध घटकांना प्रोत्साहनपर निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

या निर्णयानुसार, ई-वाहनांच्या मागणीला चालना देण्यासाठी उत्पादक कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर अनुदान देण्यात आले आहे. यात बजाज ऑटो लिमिटेड, महिंद्रा इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेड आणि ऑलेर मोटर्स प्रा. लिमिटेड यांना तीन चाकी वाहनांसाठी



एकूण २.५१ कोटींहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, राज्यातील प्रमुख शहरी वाहतूक उपक्रमांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. बेस्ट, नागपूर महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका आणि ठाणे महानगरपालिका या सहा उपक्रमांना मिळून ४.५५ कोटींचा निधी देण्यात आला आहे. यामुळे शहरांमध्ये सार्वजनिक ई-वाहतूक अधिक सक्षम होणार आहे.

याशिवाय इतर कंपन्यांनादेखील ई-दुचाकी व ई-तीनचाकी वाहनांसाठी एकूण ४.४५ कोटींपेक्षा अधिक प्रोत्साहन रक्कम वितरित करण्यात येणार आहे. शासनाने स्पष्ट केले आहे की, हा निधी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच २०२६-२७ या आर्थिक वषार्साठी ई-वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी २४६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील ई-वाहन क्षेत्राला मोठी चालना मिळणार असून, प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# जैन मंदिरातील पावणेदोन कोटींच्या दागिन्यांच्या चोरीचा पर्दाफाश... सुरक्षारक्षकाला मध्यप्रदेशातून अटक

**■मुंबई। प्रतिनिधी,**

लालबाग परिसरातील जैन मंदिरात झालेल्या पावणेदोन कोटींच्या हिरेजडीत दागिन्यांच्या चोरीचा पदार्फाश करून काळाचौकी पोलिसांनी मंदिरातील एका माजी सुरक्षारक्षकाला मध्यप्रदेशातून अटक केली आहे. जितेंद्र ऊर्फ जितन ऊर्फ बंटी पंडित नगाईच असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून पोलिसांनी चोरीचे सर्व दागिने आणि हिरे हस्तगत केले आहेत. चोरीनंतर तो त्याच्या मध्यप्रदेशातील गावी पळून गेला होता. मात्र 48 तासात त्याला गजाआड करण्यात पोलिसांना यश आले आहे.

तक्रारदार लालबाग परिसरात राहत असून कापड व्यापारी आहेत आणि ते याच परिसरात असलेल्या अविघ्न स्टेट मुनीसुरत स्वामी श्वेतांबर मूतीर्पूजक जैन संघाच्या ट्रस्टमध्ये कार्यकारी सदस्य म्हणून काम करतात. मंदिरात भगवान सिमंदर यांची एक मूर्ती असून या मूतीर्ला दिड कोटींचे विविध सोन्याचे दागिने आणि पंचवीस लाखांचा एक हिंर्याचा टिका लावण्यात आला आहे. 29 मार्चला रात्री उशिरा मंदिरात कुलूप तोडून अज्ञात व्यक्तीने आत प्रवेश केला होता. भगवान सिमंदर यांच्या अंगावरील विविध सोन्याचे दागिने आणि हिरा असा सुमारे पावणेदोन कोटींचा मुद्देमाल चोरी करून आरोपीने



पलायन केले होते. दुर्सया दिवशी हा प्रकार उघडकीस येताच काळाचौकी पोलिसात चोरीची तक्रार दाखल करण्यात आली. यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता.

सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केल्यानंतर या चोरीमागे मंदिराचा माजी सुरक्षारक्षक जितेंद्र नगाईच याचा सहभाग उघडकीस आला होता. तो मध्यप्रदेशात पळून गेल्याचे समजताच एक टिम तिथे रवाना करण्यात आली होती. पोलीस उपायुक्त रागसुधा आर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय अमीत भोसले, हसन मुलानी, गोविंद खैरे, प्रताप बंडगर, श्यामसुंदर भिसे, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र चव्हाण, धनंजय व्यवहारे, शीतल माने, सागर बनकर, ऋषिकेश कर्नर, पोलीस शिपई लक्ष्मण खांडेकर, गणेश कोळेकर, पंकज आंग्रे, यिजय सोनावणे, गोपाल चव्हाण, प्रशांत पवार, महिला पोलीस शिपाई तेजस्विनी गवारी, कुंभार, संकेत नायकवडी, पोलीस हवालदार अमर चन्ने, गोविंद ठोके यांनी मध्यप्रदेशातील गावाहून जितेंद्रला चौकशीसाठी ताब्यात घेतले. चौकशीत त्यानेच ही चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याकडून चोरी केलेले पावणेदोन कोटींचे सर्व दागिने आणि हिरे जप्त केले.

अटकेनंतर जितेंद्र नगाईचला पुढील कारवाईसाठी मुंबईत आणण्यात आले. तपासात समोर आले की, जितेंद्र नगाईच हा पूर्वी याच मंदिरात सुरक्षारक्षक म्हणून काम करत होता. तो मूळचा मध्यप्रदेशच्या भिंडचा रहिवाशी असून रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध मध्यप्रदेशातील विविध पोलीस ठाण्यात सतराहून अधिक गुन्ह्यांची नोंद असून त्यात आर्म्स ॲक्टसह लुटमारीच्या गुन्ह्यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# तू मला काय देशील...?
## केडीएमसीतल्या महिला कर्मचाऱ्याकडे नको ती मागणी

**■कल्याण। प्रतिनिधी,**

काही दिवसांपूर्वी कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेत एक धक्कादायक प्रकार उघड झाला. 'सेटलमेंट'च्या नावाखाली एका महिला कर्मचाऱ्याकडे वरिष्ठाने शरीरसुखाची मागणी केली होती. डोंबिवलीच्या सावळाराम क्रीडा संकुलातील वरिष्ठ लिपिक भूषण पाटीलवर गुन्हा दाखल झाल्यानंतर आता पालिकेने त्याच्यावर कारवाई केली आहे. वरिष्ठांकडे तक्रार करूनही कारवाई होत नसल्याने अखेर महिला कर्मचाऱ्याने मानपाडा पोलीस ठाण्यात भूषण पाटील विरोधात तक्रार नोंदवली होती. या घटनेने ङउटउ मधील महिलांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर कारवाई का केली? असा संतप्त महिला कर्मचाऱ्यांनी सवाल विचारला आहे. नोकरीवरुन काढून टाकण्याची धमकी देत भूषण पाटीलने या महिला कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी केली होती.

गुन्हा दाखल झाल्यानंतर पालिकेने भूषण पाटीलवर निलंबनाची कारवाई केली आहे. ही घटना निवडणुकीच्या काळात घडली होती. राज्यातील अन्य महापालिकांप्रमाणे 15 जानेवारीला मतदान आणि 16 जानेवारीला मतमोजणी झाली. पीडित महिलेकडे सावित्रीबाई फुले कलामंदिरात उघडलेल्या एक खिडकी योजनेच्या ठिकाणी आवक-जावक रजिस्टर भरण्याचं काम दिलं होतं. 17 जानेवारीला भूषण पाटील आणि पीडित महिला कर्मचाऱ्यामध्ये वाद झाला होता. त्यावेळी भूषण पाटील तिला भरपूर बडबडला होता.

**तू मला काय देशील?**

त्यानंतर तीन दिवसांनी 20 जानेवारीला भूषण पाटीलने रात्री आठच्या सुमारास पीडित महिला कर्मचाऱ्याला व्हॉट्स अप कॉल केला. त्यावेळी भूषण पाटील पीडित महिलेला बोलला की, तुझ्याबरोबर अजून एकाला कामावरुन काढून टाकण्याचे वरिष्ठांनी मला आदेश दिले आहेत. त्याने माझ्याशी सेटलमेंट केलीय. तू मला काय देशील?. त्यावेळी महिलेने चॉकलेट देईन असं सांगितलं. त्यावर भूषण पाटीलने तिच्याकडे मला तुझ्याकडून शरीरसुख हवय अशी मागणी केली. त्यानंतर तिने हा प्रकार आपल्या वरिष्ठांच्या कानावर घातला. पण काहीच कारवाई होत नसल्याने अखेर तिने मानपाडा पोलीस स्टेशन गाठलं. तिथे गुन्हा दाखल झाल्यानंतर केडीएमसीने भूषण पाटीलला निलंबित केलं.



# मुलीच्या घरासमोर चकरा का मारतो?
## विचारणा केल्यामुळे वाद, रागाच्या भरात एसआरपीएफ कर्मचाऱ्याची हत्या

**■नागपूर। प्रतिनिधी,**

नागपूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसर हादरला आहे. घराजवळ संशयास्पदरीत्या वारंवार चकरा मारणाऱ्या युवकाला जाब विचारल्याने उफाळलेल्या रागातून एका एसआरपीएफ कर्मचाऱ्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे मातोश्री नगर परिसरात भीती आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. पंकज ठाकूर (रा. वानाडोंगरी, मातोश्री नगर) असं मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव असून ते एसआरपीएफमध्ये कार्यरत होते.



मिळालेल्या माहितीनुसार, परिसरात राहणारा आकाश मंडल हा युवक ठाकूर यांच्या मुलीचा पाठलाग करत यांच्या घराजवळ वारंवार चकरा मारत होता. ही बाब मुलीने वडिलांना सांगितल्यानंतर पंकज ठाकूर यांनी त्याला 'वारंवार इथे चकरा का मारतो' अशी विचारणा करत जाब विचारला. त्यानंतर गुरुवारी पुन्हा आरोपी आकाश हा ठाकूर यांचा मुलीशी बोलण्या प्रयत्न करताना दिसला त्यानंतर आरोपी आणि पंकज ठाकूर यांच्यात वाद झाला. आणि काही वेळाने ते तिथून निघून गेले.

घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मुख्य आरोपी आकाश मंडल आणि त्याच्या भावाला अटक केली आहे. इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. तसेच या घटनेमागील नेमके कारण आणि इतर कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

दरम्यान, या घटनेनंतर मातोश्री नगर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. किरकोळ कारणावरून एवढ्या टोकाची हिंसक प्रतिक्रिया दिल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

मात्र थोड्या वेळात आरोपी आकाश मंडलने त्याचा भाऊ हर्षित मंडल आणि काही साथीदारांना सोबत घेत घेऊन पंकज ठाकूर यांना गाठत अचानक त्यांच्यावर हल्ला चढवला. या वेळी ठाकूर यांच्या सोबत असलेल्या नातेवाईकांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, मात्र आरोपींनी त्यांनाही मारहाण केली. या झटापटीदरम्यान आकाश मंडलने लोखंडी रॉडने ठाकूर यांच्यावर जोरदार वार केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या हल्ल्यात ठाकूर यांच्या काही नातेवाईकांनाही दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# महिलेच्या चेहऱ्याला काळे फासून काढली धिंड

**■मुंबई। प्रतिनिधी,**

झारखंडची राजधानी राँचीमध्ये माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका 28 वर्षीय महिलेच्या पतीसोबत असलेल्या वादाचा सूड उगवण्यासाठी शेजाऱ्याने महिलेच्या चेहऱ्याला काळे फासून तिची भररस्त्यात धिंड काढल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी राँची पोलिसांनी तत्परता दाखवत एका महिलेसह दोन आरोपींना अटक केली असून त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

**दुचाकीच्या वादातून सुडाचा प्रवास**

ही घटना रविवारी राँचीच्या सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'भाभानगर' वसाहतीत घडली. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि मुख्य आरोपी पंकज सिंग हे एकाच वसाहतीत भाड्याने राहणारे शेजारी आहेत. चार-पाच दिवसांपूर्वी पीडित महिलेच्या पतीने पंकजची दुचाकी त्याला कोणतीही पूर्वसूचना न देता नेली होती. पंकजने याला 'चोरी' समजून वाद घातला. महिलेने आपला पती दुचाकी घेऊन गेल्याचे मान्य केले होते आणि ती लवकरच परत करण्याचे आश्वासनही दिले होते. मात्र, पंकजने संतापून या वादाचे पर्यवसान अत्यंत खालच्या पातळीवरील कृत्यात केले.

**आरोपींची कबुली आणि पुढील तपास**

पोलिसी खाक्या दाखवताच दोन्ही आरोपींनी आपला गुन्हा कबूल केला आहे. "जर दुचाकी चोरीला गेली होती, तर पोलिसांत तक्रार का केली नाही?" या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर आरोपींना देता आले नाही. पोलिसांनी दोन्ही आरोपींवर 'भारतीय न्याय संहितेच्या' विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. किरकोळ कारणावरून एका महिलेचा असा सार्वजनिक अपमान केल्याबद्दल स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पोलीस आता या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

## सराफांना फसवणाऱ्या ठकसेनाला ठाण्यात अटक
# 3 कोटींचे सोने आणि लाखो रुपये जप्त

**■ठाणे। प्रतिनिधी,**

पोलिसांना पाच महिने गुंगारा देणाऱ्या भामट्याला पकडण्यात ठाणे पोलिसांना यश आले आहे. या आरोपीने शुद्ध सोने असल्याचा दावा करून ठाणे आणि भिवंडीतील सराफांची फसवणूक केली होती. ठाणे गुन्हे शाखा घटक 1 च्या पोलिसांनी त्याच्याकडून 3 कोटी रुपये मूल्य असलेले सोने आणि 17 लाख 50 हजार रुपये रोख रक्कम जप्त केली. पोलिसांनी हा ऐवज आणि रक्कम ठाणे जिल्हा तसेच राजस्थानमधील पालीमध्ये जाऊन जप्त केला आहे.

जीवाराम वधार्जी चौधरी (46, ठाणे, मूळगाव पाली-राजस्थान) यांनी गेल्या वर्षी दिवाळीच्या सुमारास काही सराफांना गंडा घातला होता. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध ठाणेनगर पोलीस ठाण्यात 17 ऑक्टोबर 2025 आणि 29 ऑक्टोबर 2025 रोजी गुन्हे दाखल झाले होते. याचा तपास ठाणे गुन्हे शाखा घटक 1 कडून करण्यात येत होता.

मात्र, आरोपी जीवाराम चौधरी वारंवार लोकेशन बदलत असल्यामुळे त्यांचा शोध घेणे कठीण जात होते. अखेर तो ठाण्यातील घोडबंदर रोडवर येणार असल्याची माहिती खबऱ्याकडून मिळाल्यानंतर ठाणे गुन्हे शाखा घटक 1 चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक



दीपक घुगे आणि त्यांच्या पथकाने आरोपीला 23 मार्च रोजी रात्री अटक केली.

न्यायालयाने आरोपीला 2 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. त्या तपासात पोलिसांनी पाली-राजस्थान आणि ठाणे जिल्ह्यातून 1 किलो 216 ग्रॅम आणि 742 ग्रॅमच्या सोन्याच्या लगडी जप्त केल्या. त्यांची किंमत 3 कोटी रुपये आहे. तसेच त्यांच्याकडून 17 लाख 50 हजार रुपये हस्तगत केले. अपर पोलीस आयुक्त डॉ. पंजाबराव उगले, उपायुक्त (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहा. पोलीस आयुक्त शोध 1 (गुन्हे शाखा), शेखर बागडे यांच्या सूचनांचे पालन करत व.पो.नि. सचिन गायकवाड, उपनिरीक्षक दीपक घुगे, दीपक जाधव, सहा. पोलीस निरीक्षक सुनील माने, हवालदार संदीप महाडिक, प्रशांत निकुंभ, अविनाश पाटील, शब्बीर फरास, सागर सुरळकर, अमोल ढावरे, प्रशांत लवटे यांनी ही कामगिरी केली.

# पोटदुखीमागचं भयानक कारण समोर! १२ वर्षीय मुलीच्या पोटातून निघाला केसांचा गोळा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत १२ वर्षीय मुलीच्या पोटात अनेक वर्षे साचलेला केसांचा प्रचंड गोळा शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आला. सतत उलट्या, भूक न लागणं आणि पोट भरल्यासारखं वाटणं या लक्षणांमागचं धक्कादायक कारण तपासात समोर आलं. डॉक्टरांनी वेळेवर निदान आणि मानसिक आरोग्याच्या महत्त्वावर भर दिला आहे.

सतत उलट्या होणं, भूक न लागणं आणि थोडंसं खाल्लं तरी पोट भरल्यासारखं वाटणं या त्रासामुळे एका १२ वर्षीय मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. साध्या वाटणाऱ्या या लक्षणांमागे मात्र गंभीर कारण दडलं होतं. तपासणीत तिच्या पोटात प्रचंड केसांचा गोळा साचलेला आढळला आणि शस्त्रक्रियेद्वारे तो यशस्वीरीत्या काढण्यात आला.

**वयानुसार शारीरिक वाढ मंदावल्याने तपासणी...**



मुंबईतील एका खासगी रुग्णालयात या मुलीवर उपचार करण्यात आले. तिचं वजन सुमारे ३९ किलो असून तिला यापूर्वी कोणताही गंभीर आजार किंवा शस्त्रक्रिया झालेली नव्हती. मात्र वयानुसार तिची शारीरिक वाढ अपेक्षेपेक्षा खूपच मंद असल्याचं डॉक्टरांच्या लक्षात आलं. त्यामुळे डॉक्टरांनी सखोल तपासणी करण्याचा निर्णय घेतला.

**तपासणीदरम्यान पोटात साचलेला केसांचा गोळा समोर**

तपासणीदरम्यान गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी विभागातील बालरोग तज्ञ डॉ. आदित्य कुलकर्णी यांनी पोटाच्या वरच्या डाव्या भागात गाठ जाणवली. त्यानंतर रक्त तपासण्या आणि सीटी स्कॅन करण्यात आले. या तपासणीत पोटात मोठा गोळा असल्याचं स्पष्ट झालं.

यानंतर करण्यात आलेल्या एंडोस्कोपीमध्ये पोटापासून लहान आतड्याच्या सुरुवातीपर्यंत पसरलेला केसांचा मोठा गोळा असल्याचं दिसून आलं. हा गोळा पोटाच्या ९० टक्क्यांहून अधिक भाग व्यापून होता.

**उपचारानंतरची स्थिती**

शस्त्रक्रियेनंतर मुलीला काही दिवस बालरुग्ण विभागात निरीक्षणाखाली ठेवण्यात आलं. तिसऱ्या दिवसापासून तिला पाणी आणि हलका आहार देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर हळूहळू मऊ आहारावर नेण्यात आलं आणि सात दिवसांत तिला डिस्चार्ज देण्यात आला.



पुढील उपचार आणि आहाराबाबत डॉक्टरांनी मार्गदर्शन केलं.

**ओपन सर्जरी करावी लागली...**

डॉक्टरांनी सुरुवातीला एंडोस्कोपीद्वारे हा गोळा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा आकार मोठा आणि रचना घट्ट असल्याने पूर्णपणे काढणं सुरक्षित नव्हतं. त्यामुळे बालशल्यचिकित्सा विभागातील वरिष्ठ सल्लागार डॉ. रसिकलाल शाह यांनी ओपन सर्जरी करण्याचा निर्णय घेतला.

सुमारे तीन तास चाललेल्या शस्त्रक्रियेदरम्यान पोटातून १६ बाय १४ सेंटीमीटर आकाराचा केसांचा गोळा बाहेर काढण्यात आला. हा गोळा जवळपास पोटाच्या आकारासारखाच होता. तपासणीत तो ह्यट्रायकोबेजोअरह्ल असल्याचं स्पष्ट झालं असून त्यात केस, म्युकस आणि अन्नकण आढळले. सुदैवाने कर्करोगाची कोणतीही चिन्हं आढळली नाहीत.

**डॉक्टरांचा सल्ला**

डॉक्टरांच्या मते, मानवी केस पचत नसल्यामुळे ते वारंवार गिळल्यास पोटात साचत जातात आणि कठीण गोळा तयार होतो. या प्रकरणात हा गोळा तीन ते चार वर्षांत हळूहळू तयार झाला होता.

तज्ञांनी सांगितलं की, अशा प्रकारच्या समस्या काही वेळा मानसिक ताण, चिंता किंवा वर्तनाशी संबंधित विकारांमुळे उद्भवतात. त्यामुळे समुपदेशन, मानसोपचार, वर्तन उपचार आणि भावनिक आधार देणं अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून अशा घटना पुन्हा होऊ नयेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com